# U. S. OSTWAL INTERNATIONAL SCHOOL

OSTWAL WONDER CITY, BOISAR (E)

**TERM-1**

**Name :_________________________________** **Date:_________**

**Grade : VII** **Marks: 40**

**Subject : Marathi** **Roll No:_______**

**Time : 2 hr**

**General Instructions:**

- **All questions are compulsory**
- **Do not write the questions. Directly write the answers.**
- **Write the paper neatly. Reading time: 15 minutes.**

**प्र.१.अ) खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (५)

'"जय जवान! जय किसान!'' भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्रींनी दिलेला हा नारा! . किती समर्पक आहे हा नारा! एक देशाचं रक्षण करतो तर दुसरा देशाचं पोट भरतो. देशासाठी खरेच, सैनिक जितका महत्त्वाचा, तितकाच महत्त्वाचा शेतकरी सुद्धा आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी शेतात खूप राबतो, तेव्हा कुठे आपल्याला खायला मिळतं. आपल्याकडे खरीप आणि रब्बी हंगाम, अशा दोन हंगामात शेती केली जाते. हवामानानुसार दोन्ही हंगामात वेगवेगळी पिके घेतली जातात. ज्या प्रदेशात जसे हवामान असते त्या प्रमाणे तिथे कोणते पीक घ्यायचे हे ठरवले जाते.

भारतातील बरीचशी शेती ही कोरडवाहू स्वरूपाची आहे. कोरडवाहू शेती ही फक्त पावसावर अवलंबून असते. काही सधन शेतकरी ओलीताची शेती म्हणजे शेतात विहीर खणून किंवा कूपनलिका करून सिंचन पद्धतीचा अवलंब करतात आणि बारमाही पिके घेतात. बरेचदा पावसाअभावी धान्य पिकत नाही; त्याला नापिकी असे म्हणतात. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे हाल होतात. कित्येक गरीब शेतकरी कर्जबाजारी होतात. अशावेळी आपले सरकार शेती सिंचनाखाली आणण्यासाठी गरीब शेतकऱ्यांना मदत करते. बी, बियाणे, खते घेण्यासाठी मदत करते.

१) "जय जवान! जय किसान!" हा नारा कोणी दिलेला आहे?
२) सैनिक जितका महत्त्वाचा तितकाच महत्त्वाचा कोण आहे?
३) आपल्या कडे कोणत्या दोन हंगामात शेती केली जाते?
४) फक्त पावसावर कोणती शेती अवलंबून असते?
५) बरेचदा पावसाअभावी धान्य पिकत नाही त्याला काय म्हणतात?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** (३)

१) नैसर्गिक वातावरणात मन ___________________ होते.
२) पाऊस पडल्यानंतर काही दिवसातच ___________________ करतात.
३) पुन्हा माझिया हाताने ____________________ भरवीन.

**क) योग्य जोड्या जुळवा.** (३)

| | |
|---|---|
| १) अन्नदाता | अ) मित्र |
| २) निसर्ग | ब) गोफण |
| ३) पाखरांपासून रक्षण | क) शेतकरी |

**ड) खालील घटनांमुळे काय परिणाम होईल ते लिहा.** (३)

१) बर्फ वितळल्यामुळे.........
२) वाऱ्याची झुळूक आल्यावर.........
३) अतिवृष्टी झाल्यामुळे...........

**प्र.२.अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(५)**

१) निसर्गात कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो?

२) जंगली जनावरांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकरी काय करतात?

३) कवयित्रीने स्वतःला कोणाची कन्या म्हटले आहे? ती कोणता धर्म जाणते?

४) बाबांसोबत आनंदवनासाठी ठामपणे कोण उभे राहिले?

५) प्रकाश आमटे यांचा स्वभाव कसा होता?

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

१) सुरुवातीला आनंदवनात बाबा आमटे यांना भेटायला फारसे कोणी का येत नसत?

२) शेतकऱ्याला आपला अन्नदाता का म्हणतात?

**क) कोण ते लिहा.** **(२)**

१) बोलका असणारा

२) फ्यूज दुरुस्त करणारा

**ड) खालील शब्द शुद्ध करून लिहा.** **(२)**

१) नीसार्ग - ______________ २) रकक्षण - __________________

**प्र.३.अ) खाली दिलेल्या वाक्प्रचाराचा अर्थ लिहा.** **(२)**

१) भटकंती करणे - _______________ २) मात करणे - _______________

**ब) दिलेल्या शब्दाचा अर्थ लिहा.** **(२)**

१) नारा - ______________ २) अन्नदाता - ________________

**प्र.४.अ) समानार्थी शब्द लिहा.** **(२)**

१) दरारा - ______________ २) राबणे - ________________

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(2)**

१) कठीण × _____________ २) गरीब × ________________

**क) लिंग बदला.** **(२)**

१) शेतकरी - _____________ २) वाघ - ________________

**ड) वचन बदला.** **(३)**

१) पीक - _______________ २) डोळा - _______________

३) जनावर - ______________

***ALL THE BEST***